कंट्रोल मो.9137758484
ई-मेल-srpfgr11@rediffmail.com
cmdt.srpf11.navimum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन,
समादेशक,राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.११,
नवी मुंबई – ४००६१२

क्र.आशा / प्रलि / गट–11 / पो.भ.2022–23 / लेखी परिक्षेबाबत सुचना / 100 / 2024,मुंबई, दि. 09 / 08 / 2024

# राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 11, नवी मुंबई.
# सशस्त्र पोलीस शिपाई – 2022–23
# लेखी परीक्षाकरिता पात्र उमेदवारांना सुचना

1)राज्य राखीव पोलीस बल गट क्र.8 मुंबई या आस्थापनेवर सन 2022–23 मध्ये रिक्त असलेल्या 344 पदांकरिता पोलीस भरती 2022–23 आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार लेखी परिक्षे करिता 1:10 प्रमाणे एकुण 5148 उमेदवार पात्र झाले आहेत.

2) सशस्त्र पोलीस शिपाई भरती 2022–23 लेखी परिक्षा दिनांक 13 / 08 / 2024 रोजी दुपारी वेळ 11:00 वाजता घेण्यात येणार असुन त्याबाबतचे लेखी प्रवेशपत्र महा–आयटी कंपनी, मुंबई यांचेकडुन उमेदवारांना वाटप करण्यात आले आहे. त्याप्रमाणे उमेदवारांना परिक्षा केंद्रावर सकाळी 07:00 वाजता हजर राहणे अनिवार्य आहे. लेखी परिक्षा सुरू झाल्यानंतर कोणत्याही उमेदवारांस परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही, यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

3) लेखी परिक्षेकरिता येणा–या उमेदवारांनी महा –आयटी यांनी दिलेले लेखी परिक्षाबाबतचे प्रवेशपत्र, तसेच मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र (ओळखपत्र) उमेदवारांकडे असतील तरच परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल, यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

4)उमेदवारांचे स्वतःचे वैध फोटो आयडी (उदा. पॅन कार्ड, आधारकार्ड, मतदान कार्ड, वाहन चालक परवाना, महाविदयालयीन ओळखपत्र, पासपोर्ट इत्यादी) सोबत असणे अनिवार्य आहे.

5) उमेदवार यांनी कोणत्याही प्रकारचे पेन, मोबाईल फोन, डिजीटल वॉच, डायरी , मायक्रो फोन, ईअर फोन किंवा कोणत्याही प्रकारचे ईलेक्ट्रानिक डिव्हाईस तसेच नोटस् व पुस्तके परिक्षा केंद्राच्या आत सोबत घेवुन येता येणार नाही, यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसे आढळुन आल्यास भरती प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल. किंवा उमेदवारी रदद् करण्यात येईल.

6) उमेदवारांनी परिक्षा केंद्रामध्ये एकदा प्रवेश केल्यानंतर परिक्षा संपेपर्यंत कुठल्याही परिस्थितीमध्ये परिक्षा केंद्राच्या बाहेर जाता येणार नाही, यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

7) परिक्षा केंद्राच्या आवारात मित्र, नातेवाईक, पालक व अन्य अनाधिकृत व्यक्तीस प्रवेश देण्यात येणार नाही, यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

8) लेखी परिक्षेकरिता येतांना उमेदवारांनी स्वतःचे दोन पासपोर्ट साईज छायांचित्र सोबत आणावे.

9) उमेदवारांनी पावसाळी ऋतु सुरू असल्याने त्यांनी पावसापासुन बचावाकरिता आवश्यक ती संसाधने सोबत बाळगावीत.

10) उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर आल्यानंतर त्यांच्या जवळील बॅग त्यांच्या जबाबदारीने परिक्षा केंद्राबाहेर ठेवावी.तसेच उमेदवारांचे मोबाईल, मौल्यवान वस्तु, इलेक्ट्रॉनिक वस्तु यासर्व वस्तु परिक्षा केंद्राबाहेर ठेवावीत. सदर पैकी कोणतीही वस्तु गहाळ झाल्यास राज्य राखीव पोलीस बल गट क.11, नवी मुंबई हे जबाबदार असणार नाही, यांची सर्व उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

11) परिक्षा केंद्रावर अथवा परिक्षा केंद्राच्या परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही याकरिता परिक्षा केंद्रावर सेक्टरनिहाय व्हीडीओ रेकॉडींग तसेच सी.सी.टी.व्ही. रेकॉडींग करण्यात येणार आहे. तसेच ओळख पाठविण्याकरिता प्रत्येक उमेदवारांची बायोमॅट्रीक्स घेण्यात येणार असुन डमी उमेदवार आढळुन आल्यास तसेच परिक्षेदरम्यान गैरवर्तन आढळुन आल्यास उमेदवारास लेखी परिक्षेतुन अपात्र करून किंवा उमेदवारी रदद् करून त्या उमेदवारावर गुन्हा दाखल करण्यात येईल, यांची सर्व उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

12) उमेदवारांना लेखी परिक्षा केंद्राचे जे ठिकाण दिले आहे, त्या ठिकाणी कोणत्याही उमेदवारांना किंवा त्यांचे नातेवाईक यांना रात्री मुक्काम करता येणार नाही अथवा थांबता येणार नाही. सदर ठिकाण अत्यंत रहदारीचे आहे त्या ठिकाणी कोणतीही वास्तव्य सुविधा उपलब्ध नाही. यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

13) राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.11 नवी मुंबई या गटाच्या लेखी परिक्षेकरिता बैठक व्यवस्थाही मैदानी चेस्ट नंबर (ओळखपत्रावर नमुद असलेला छाती क्रमांक ) प्रमाणे नसुन महा–आयटी कडुन लेखी परिक्षेकरिता उमेदवारांना देण्यात आलेले ऑनलाईन लेखी बैठक क्रमांक नुसार करण्यात आली आहे. तसेच उमेदवारांना देण्यात आलेला लेखी बैठक क्रमांक व चेस्ट क्रमांक उमेदवारांच्या प्रवेशपत्रावर (Hall ticket) खालीलप्रमाणे दर्शविण्यात आले आहेत.

( उदा. लेखी बैठक क्रमांक 10001– मैदानी चेस्ट क्रमांक 3510 )

| **चेस्ट क्रमांक –10001 - 3510** |
| --- |

↑ **लेखी बैठक क्रमांक** ↑ **मैदानी चेस्ट क्रमांक**

14) लेखी परिक्षेदरम्यान उमेदवार आपसात बोलतांना आढळल्यास सदरचा प्रकार नकल करत असल्याचे समजुन दोन्ही उमेदवारांना त्याक्षणीच पुढील भरती प्रक्रियेकरिता अपात्र ठरविण्यात येईल, यांची सर्व उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

15) एखादा उमेदवार लेखी परिक्षेस गैरहजर राहिल्यास, त्याला पुन्हा लेखी परिक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरिक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल. यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

16) उमेदवार अथवा त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट / दलाल , अधिकारी / कर्मचारी यांच्या भुलथापांना / अमिशाला बळी पडु नये, उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

ठिकाण :– नवी मुंबई
दिनांक :– 09 / 08 / 2024

( मोक्षदा पाटील ) भापोसे
पोलीस उप–महानिरीक्षक (अति.कार्यभार) राज्य राखीव
पोलीस बल (मुख्या.), महाराष्ट्र राज्य, मुंबई
तथा
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.8 मुंबई व
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.11
नवी मुंबई कॅम्प बाळेगांव